फेरफ
दस्त क्र ३६०२/२००७
४९/५४

एस.टी.डी. (०२५२५)
दुरध्वनी क. २५४१३६

# पालघर नगरपरिषद, पालघर

ता. पालघर, जि. ठाणे
पीन : ४०१ ४०४

स्थापना: १.१२/१/१९९८

जावक क्र.पा.न.प./बांध/ ६४ /२००६–२००७
दिनांक : २०/०३/२००७

वाचले :
1) श्री. चंदकांत निळकंठ दांडेकर यांचा अर्ज
2) मा. अपर जिल्हाधिकारी ठाणे यांचे कार्यालय मुख्यालय उल्हास यांचे कडील
पत्र क्र. महसूल/कक्ष–१/टे–२/एनएपी/एसआर–४८/०६ दि. २८/२/०७
रोजीचा अभिप्राय
3) आर्किटेक्ट श्री. महेंद्र काळे यांचे पत्र
4) कनिष्ठ अभियंता, पालघर नगरपरिषद यांचा दि. ५/३/०७ रोजीचा
अहवाल
5) नगररचना आणि मुल्यनिर्धारण विभाग विकास योजना विशेष घटक पालघर यांचेकडील
जा.क्र. नर/वियोविघ/पालघर–१ दि. १५/३/२००७ रोजीच्या पत्राचा अभिप्राय

## अकृषिक वापर मंजूरी मिळणेसाठी नाहरकत दाखला:

श्री. चंदकांत निळकंठ दांडेकर (कुलमुख्यत्यार पत्रधारक) रा. पालघर, ता. पालघर, जि. ठाणे यांनी मौ. पालघर, ता. पालघर येथिल सर्वे नं. १३० क्षेत्र ७४५००.०० चौ. मी. पै. कब्जात व वहिवाटीत नसलेले क्षेत्र १२५.०० चौ.मी. वगळता व शेतजमीनी खालील कायम ठरलेले ५३२५.५८ चौ.मी. क्षेत्र वगळता उर्वरित ६९०५५.४२ चौ.मी. जागेत औद्योगिक प्रयोजनासाठी बिनशेती/रेखांकन परवानगी मिळावी म्हणून विनंती केली असून सदर प्रकरणी सहाय्यक संचालक नगररचना ठाणे यांचेकडील जा.क्र./ससठाणे/लघुऔद्योगिक/रेखांकन परवानगी/पालघर/पालघर/४७८/ठाणे दि. २१/२/२००७ अन्वये बिनशेती रेखांकन नकाशास मंजूरी दिलेली आहे. तसेच नगररचना आणि मुल्यनिर्धारण विभाग विकास योजना विशेष घटक, पालघर यांनी जा.क्र. नर/वियोविघ/पालघर–१ दि. १५/३/२००७ नुसार सदर जागेवर कोणत्याही प्रकारचे आरक्षण नसल्याचे स्पष्ट अभिप्राय दिले आहे. तरी सदर भूखंडास खालील अटी व शर्तींना अधिन राहून नगरपरिषदेची हरकत नाही.

1) नगररचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, ठाणे शाखा यांनी नमूद केलेल्या सर्व अटी अर्जदारावर बंधनकारक राहतील.
2) संबंधित महसूल खात्याची परवानगी घ्यावी.
3) इतर आवश्यक त्या खात्याची/संबंधितांची परवानगी घेणे अर्जदारावर बंधनकारक राहील.
4) रेखांकनातील प्रत्येक भुखंड विकसित करणेपूर्वी नगरपरिषदेची परवानगी घेणे अर्जदारावर बंधनकारक राहील.
5) रेखांकनातील भूखंडाचे बेटरमेंट चार्जेस भरणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.
6) सादर केलेली माहिती खोटी अथवा दिशाभूल करणारी असल्यास सदरचा नाहरकत दाखला रद्द करणेत येईल याची अर्जदाराने नोंद घ्यावी.
7) पालघर नगरपरिषदेची विकास योजना अद्याप प्रसिद्ध झालेली नाही त्यामुळे भविष्यात सदर जागा पालघर नगरपरिषदेच्या विकास आराखड्यास बाधीत होत असल्यास वा आवश्यकता असल्यास ती आपणास उपलब्ध करून द्यावी लागेल.
8) वरीलपैकी कोणत्याही अटींचा भंग झाल्यास सदर परवानगी रद्द समजण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अभियंता | मुख्यलिपिक | मुख्याधिकारी २०/३/०७ |
| पालघर नगरपरिषद | पालघर नगरपरिषद | पालघर नगरपरिषद |